




# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ३८३ वा    शुक्रवार दि ०५ जून २०२६    पृष्ठ ८    किमंत ३ रुपये


# नाशिकमध्ये भाजपची डोकेदुखी वाढली, शेवटच्या दिवशीही बंडखोर उमेदवाराची माघार नाही, कारण काय? कोण आहेत गोकुळ गीते?

**वृत्तसंस्था कोलकाता**

नाशिक : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. आज निवडणुकीतून माघार घेण्याचा अखेरचा दिवस होता. त्याचदरम्यान, नाशिक विधान परिषद निवडणुकीत अत्यंत वेगवान घडामोडी पाहायला मिळाल्या. महायुतीमधील बंडखोरी रोखण्यासाठी भाजपचे संकटमोचक आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीला अखेर यश आले असून, माजी स्थायी समिती सभापती गणेश गीते यांनी निवडणुकीतून अधिकृतपणे माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या निर्णयानंतर त्यांचे बंधू गोकुळ गीते हे आक्रमक झाले असून, ते अपक्ष निवडणूक लढण्यावर ठाम असल्यानं महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांच्यासमोरील पेच कायम आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत गणेश गीते यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक लढवली होती. या संपूर्ण निवडणुकीचं नियोजन आणि कॅम्पेन गोकुळ गीते यांनीच सांभाळलं होतं. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत गणेश गीते यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक लढवली होती. या संपूर्ण निवडणुकीचं नियोजन आणि कॅम्पेन गोकुळ गीते यांनीच सांभाळलं होतं. गोकुळ गीते हे पिंपळगाव बाजार समितीवर सलग दोनवेळा संचालक म्हणून निवडून आले आहेत, तर सध्या त्यांची



सायखेडा गटातून जिल्हा परिषद निवडणुकीची पूर्वतयारी सुरू आहे. स्थानिक पातळीवर त्यांची मोठी ताकद मानली जाते. गोकुळ गीते हे नाशिकचे माजी स्थायी समिती सभापती गणेश गीते यांचे भाऊ आहेत. महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांच्या मुलाच्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये गोकुळ गीते यांच्या वडिलांच्या नावाचा एकेरी उल्लेख केल्याने गोकुळ गीते यांनी निवडणुकीतून माघार न घेतल्याची चर्चा नाशिक शहरात रंगली आहे. हा अर्ज मागे न घेण्यात आल्यानं नाशिकमध्ये गोकुळ गीते विरुद्ध नरेंद्र दराडे अशी लढत रंगणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. कथित ऑडिओ क्लिपनुसार, महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचे पुत्र कुणाल दराडे यांनी गीते यांच्या वडिलांचा एकेरी उल्लेख केल्यानं ही गोष्ट गीते यांच्या जिव्हारी लागल्याची चर्चा आहे.

# के अण्णामलाई यांचा राजीनामा मंजूर, भाजपचे मनधरणीचे प्रयत्न फेल, नव्या पक्ष स्थापनेच्या हालचालींना वेग

**वृत्तसंस्था चेन्नई**

गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या जोरदार चर्चांच्या पार्श्वभूमीवर, तामिळनाडू भाजपचे माजी अध्यक्ष के. अण्णामलाई यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी तो स्वीकारला आहे. त्यामुळे अण्णामलाईंच्या मनधरणीचे भारतीय जनता पक्षाचे प्रयत्न फेल गेल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अण्णामालाई यांनी तामिळनाडूतील राजकीय परिस्थितीबाबत पक्षाच्या नेतृत्वाला माहिती दिली आणि पक्षातून बाहेर पडण्याच्या निर्णयामागील कारणे स्पष्ट केली. त्यानंतर अण्णामलाई यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा यासाठी पक्षातर्फे प्रयत्न केले गेले, मात्र अण्णामलाई राजीनामा देण्याच्या निर्णयावर ठाम होते. मंगळवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानी अण्णामलाई यांनी भेट घेतली. मात्र त्यांच्यात काय चर्चा झाली हे समजू शकले नव्हते. परंतु वाटाघाटींनंतरही अखेर त्यांच्या राजीनाम्यावर शिक्कामोर्तब झाल्याचे पाहायला मिळाले. अण्णामलाई भाजपला सोडचिठ्ठी देऊन राज्यात नवीन राजकीय पक्ष स्थापन करणार असल्याची चर्चा आहे. अण्णामलाई यांना भाजप प्रदेशाध्यक्षपदावरून हटवून नैनार नागेंद्रन यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर आणि २०२६ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी अण्णाद्रमुकशी निवडणूक युती पुनरुज्जीवित केल्यानंतर ते पक्षात नाराज असल्याचे सांगण्यात येत होते. दरम्यान, अण्णामलाई हे पक्ष सोडणार असल्याच्या चर्चेमुळे तामिळनाडू राज्यात अनेक ठिकाणी भाजपला गळती लागली आहे. भाजपच्या मच्छीमार विभागाचे प्रांताध्यक्ष एम. सी. मुनुसामी यांनीही राजीनामा दिला. राज्यात कार्यकर्त्यांचा अण्णामलाईंच्या भूमिकेला पाठिंबा वाढत असून, मदुराईमध्ये ज्येष्ठ अभिनेते रजनीकांत आणि अजित यांच्यासोबत अण्णामलाई यांचे हातात हात घेतलेले पोस्टर लावण्यात आले होते. भाजप युवा मोर्चाचे राज्य सचिव आर. योगेश म्हणाले, अण्णामलाई भाजप सोडणार असल्याच्या



चर्चेनंतर भाजपमध्ये कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. अनेक जण चिंतित आहेत आणि काही जण तर पक्षापासून दूर जाण्याचाही विचार करीत आहेत. या महत्त्वाच्या टप्प्यावर पक्ष नेतृत्वाने कार्यकर्त्यांना आश्वस्त करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत.

# लावणी गायनाची विच्छा माझी पुरी झाली!



आमचा ङ्क अश्रूंची झाली फुले मचा पुण्यात एकदा प्रयोग होता. त्याचवेळी दादांचा (कोंडके) ङ्कविच्छा माझी पुरी कराफ्वा पुण्यात प्रयोग होता. दोघांचे प्रयोग संपल्यावर दोन्ही नाटक मंडळ्या जेवणासाठी पुना गेस्ट हाऊसवर आल्या. त्यावेळी ङ्कविच्छाफ्चा ३००वा प्रयोग शिवाजी मंदिरला मुंबईत होणार होता, पण त्याआधी एक प्रयोग पोलादपूरला होता. दादांकडच्या गायिकेला पुढचे प्रयोग करणं काही कारणांनी शक्य होणार नव्हतं. दादांनी मला थेट विचारलं, ङ्कतुम्ही गाता का लावणी?फ मी म्हटलं, ङ्कदादा, मी आयुष्यात कधी लावणी गायले नाहीयेफ. मग दादांनी तुकाराम शिंदेंना बोलावलं. ङ्कविच्छाफ्मधल्या लावण्यांच्या चाली तुकाराम शिंदेंच्या होत्या. शिंदे म्हणाले, ङ्कबाई तुम्ही नाटकामध्ये ठुमरी गाता ना?फ. मी म्हणाले, ङ्कहो मी गाते नाफ. मग ते म्हणाले, ङ्कतुमच्या ठुमरीमध्ये आणि लावणीमध्ये काहीच फरक नाहीये. तुमच्या ठुमरीमध्ये कान्हा असतो तसा आमच्या लावणीमध्ये किसना असतो. तुमच्या ठुमरीमध्ये नखरा असतो, आमच्या लावणीमध्ये ठसका असतो. तो ठसका एकदा तुम्ही आत्मसात केलात की तुम्ही उत्तम लावणी गायिका व्हाल!फ मी तुकाराम शिंदेंकडे जाऊन शिकले. लावणी गाणं तितकंसं सोपं नाही, हे मला शिंदेंकडे जायला लागल्यावर कळलं. मला पाच लावण्या म्हणायच्या होत्या. माझं धाबं दणाणलं. अहो, जिथं ङ्कलागी करजवा कटारफ गळ्यावर चढायला महिना-दीडमहिना लागला होता, तिथं या पाच लावण्या काही दिवसांत तयार करायच्या होत्या. त्या ३००व्या प्रयोगाचा मोठा समारंभ होणार होता. एकच चांगली गोष्ट अशी होती, की ३००व्या प्रयोगाच्या आधीचा प्रयोग पोलादपूरला होता. माझ्यासाठी जणू ती रंगीत तालीमच होती म्हणा ना. त्या प्रयोगात गंमतच झाली. दादा कोंडकेंचा अभिनय, त्यांच्या कोट्या, थट्टामस्करी हे सगळं पाहून-ऐकून मी हसतच होते त्या प्रयोगात. कसंबसं हसू आवरून मी त्या लावण्या गायले. तुकाराम शिंदे पायपेटीवर असायचे, त्यांच्या शेजारी बसून मी गायचे. प्रयोग झाला आणि दादा माझ्याकडे आले आणि घोगऱ्या आवाजात म्हणाले, ङ्कहे घ्या तुमचं मानधन... नव्हे आजचे हसायचे पैसे!फ या प्रयोगापासून दादांचा ङ्कसोंगाड्याफ हा चित्रपट येईपर्यंत मी ङ्कविच्छाफ्मध्ये गायले. ङ्कविच्छाफ्चे मी चार-पाचशे प्रयोग केले. आशाबाईंना (आशा भोसले) ङ्कविच्छा माझी पुरी कराफ हे नाटक फार आवडायचं. जेव्हा वेळ असेल तेव्हा त्या प्रयोगाला यायच्या आणि मनमुराद हसायच्या. एकदा शिवाजी मंदिरला प्रयोग होता, तिथे त्या आल्या होत्या. दादांना अचानक म्हणाल्या, ङ्कहिला नऊवारी नेसून आणा स्टेजवर गवळण म्हणूनफ. मी त्यांना म्हणाले, ङ्कआशाबाई मला लोकनृत्य कसं असतं माहितंच नाहीये.फ त्या म्हणाल्या होत्या, ङ्ककराल तुम्ही, जा स्टेजवरफ. मी जरा लठ्ठ होते तेव्हा. दादा ते नेमकं हेरून सुसाट कॉमेन्ट करायचे. आम्ही तिघी-चौघी गवळणी यायचो स्टेजवर. तेव्हा त्या प्रवेशात स्टेजवर दादा असायचे आणि सोबत राम नगरकर. प्रेक्षकांमध्ये हास्याच्या लाटा येत असायच्या. त्यात आमची एन्ट्री व्हायची. मग आम्हाला पाहून दादांना ऊतच यायचा. ते म्हणायचे, ङ्कही माझी बबडी ही आईसारखी, ही माझी छबडी ही पण आईसारखी...फ मग माझ्याकडे पाहून म्हणायचे, ङ्कही आहे ना, ती बापाच्या वळणावर गेलीय! ही गवळण म्हणजे आमचं डोंगरे बालामृत आहे!फ सगळं प्रेक्षागृह दणाणून हसायचं माझ्यावरच्या कॉमेंटवर. प्रत्यक्षात दादा म्हणजे मनानं एकदम निर्मळ माणूस, पण लोकनाट्य त्यांच्या अंगात भिनायचं एकदम. मग ते प्रेक्षकांचेच होऊन जायचे. माझं त्यावेळी ङ्कअश्रूंची झाली फुलेफ सुरू होतं. बरेचदा मी तो प्रयोग संपवून धावतपळत ङ्कविच्छाफ्साठी यायचे आणि गायला बसायचे. एकदा आशाबाई शिवाजी मंदिरला प्रयोगाला आल्या होत्या. आत रंगपटात आल्या आणि मला म्हणाल्या, ङ्कअहो तुम्ही एवढ्या काठा-पदराच्या साड्या नेसता, लावण्या गाता पण टिकली-कुंकू का लावत नाही?फ मी म्हणाले, ङ्कबाई, असं काही नाही, पण मी लोकांना दिसतंच नाही हो. मग टिकली लावली काय आणि न लावली काय.फ लोकांना दिसलेच तर म्हणून मी काठापदराची साडी नेसून बसायचे. मी घाईघाईत यायचे त्यामुळे माझ्या डोक्यातही हे आलं नव्हतं. तशी मी ङ्कअश्रूंचीफ्मध्ये नीलम, सुमित्रा करताना टिकली लावतच होते, मला ते काही निषिद्ध वगैरे मुळीच नव्हतं. त्यांनी काही ऐकलं नाही. म्हणाल्या, ङ्कते काही नाही, तुम्ही टिकली लावलीच पाहिजे. या इकडे.फ असं म्हणून त्यांनी त्यांच्या मोठ्या पांढऱ्या पर्समधून लिपस्टिक बाहेर काढली आणि माझ्या कपाळावर पिंजर लावण्यापूर्वी जसं मेण लावतात तसा गोल काढला. रंगपटात छोटं देवघर असतंच, तिथं जाऊन तिथलं कुंकू घेतलं आणि माझ्या कपाळी लावलं. मग मला म्हणाल्या, ङ्कमाझी आठवण म्हणून तुम्ही ही टिकली आता लावायचीच. विच्छा माझी असेपर्यंत लावाच पण नंतर जेव्हा जेव्हा रंगमंचावर तुमचे कार्यक्रम असतील तेव्हा तेव्हा तुम्ही माझी आठवण म्हणून टिकली लावायची.फ त्यांनी दिलेला सल्ला मी आजतागायत पाळत आलीय. आज त्या आपल्यात नाहीयेत. त्यामुळे आता तर त्यांच्या या सांगण्याला वेगळं महत्त्व प्राप्त झालंय. मध्यंतरी एका कार्यक्रमासाठी गेले होते, तेव्हा टिकली लावताना मला आशाबाईंच्या आठवणीने भरून आलं एकदम.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा' हिंदू देवस्थाने संपवणारा; मंदिर महासंघाचा इशारा

■ सावंतवाडी/वृत्तसंस्था

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने प्रस्तावित असलेला 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६' हा कायदा येत्या पावसाळी अधिवेशनात मंजूर करण्याचे शासनाचे नियोजन आहे. मात्र, हा कायदा राज्यातील हजारो हिंदू देवस्थानांचे स्वायत्त अस्तित्व आणि त्यांच्या उत्पन्नांचे पारंपरिक स्त्रोत संपविणारा असून धार्मिक स्वातंत्र्य आणि पूजा-अर्चेवर गदा आणणारा आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य संघटक संजय जोशी यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.

वक्फ बोर्ड आणि चर्चच्या जमिनी वगळून केवळ हिंदू मंदिरांच्या जमिनींवर डोळा ठेवणारा हा डाव मंदिर विश्वस्त कधीही यशस्वी होऊ देणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला. सावंतवाडी येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु सत्यवान कदम, हिंदु जनजागृती समितीचे राजेंद्र पाटील, विरेश माईणकर, मंदिर महासंघ सिंधुदुर्ग जिल्हा संयोजक शिवराम देसाई, यशवंत परब, हेमेंद्र गोवेकर आदी उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत बोलताना संजय जोशी म्हणाले की, देशात भाजपची मंदिरांबाबतची भूमिका सकारात्मक असताना महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी सरकारच्या काळात नेमके काय झाले, असा प्रश्न निर्माण होतो. तत्कालीन काँग्रेस सरकारच्या काळातही असाच निर्णय घेण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र विरोधानंतर तो रद्द करण्यात आला.



आताच्या कायद्यामुळे देवस्थानांची सुमारे साडेचार लाख हेक्टर जमीन धोक्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांनी देवस्थानांना दिलेल्या इनामांच्या सनदी काढून घेण्याचे काम हे सरकार करत आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या अधिनियमाच्या आदेशाविरोधात कोणत्याही दिवाणी न्यायालयात दाद मागता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आल्याने हिंदू समाजाने न्याय कोणाकडे मागायचा, असा प्रश्न त्यांनी केला. हा कायदा केवळ हिंदू मंदिरांना लागू करून संविधानातील समानतेच्या तत्त्वाचा भंग केला जात असून, यामुळे सामाजिक आणि धार्मिक संघर्ष निर्माण होऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

**'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' लागू करण्याची मागणी..** महासंघाच्या वतीने शासनाकडे मागणी करण्यात आली आहे की, देवस्थान जमिनींना विशेष संरक्षण देण्यासाठी गुजरातच्या धर्तीवर 'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' लागू करावा आणि ७/१२ उताऱ्यावर 'देवस्थान जमीन प्रतिबंधित सत्ता प्रकार' अशी स्पष्ट नोंद करण्यात यावी. या संदर्भात महाराष्ट्रभरातून ३०० हून अधिक निवेदने देण्यात आली असून, लवकरच सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांचीही भेट घेण्यात येणार असल्याचे जोशी यांनी सांगितले. हिंदु जनजागृती समितीचे राजेंद्र पाटील यांनी सांगितले की, कायद्यानुसार देवस्थानच्या जमिनी या अहस्तांतरणीय आहेत. मात्र, कुळाच्या नावाखाली या जमिनी गिळंकृत करण्याचा आणि भू-माफियांच्या घशात घालण्याचा हा कट आहे. राज्यकर्ते आणि बिल्डर यांचे साटेलोटे जगजाहीर असून, मंदिरांच्या जमिनी हडप करून हिंदूंची मंदिर संस्कृती नष्ट करण्याचा हा घाट आम्ही तीव्र आंदोलनाद्वारे हाणून पाडू, असा इशारा त्यांनी दिला.

## 'पक्षाची बदनामी थांबवा, ठामपणे भूमिका मांडा'

■ मुंबई/वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची मंगळवारी सायंकाळी उशिरा बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाची बदनामी करणाऱ्यांना सडेतोड उत्तर द्या. पक्षाची बदनामी थांबवण्यासाठी वरिष्ठ नेत्यांनी ठामपणे आपली भूमिका मांडावी. पक्षात कोणतीही फूट पडणार नाही, पक्ष एकसंध आहे, असा संदेश लोकांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी वरिष्ठ नेत्यांना दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार, मंत्री आणि पदाधिकारी यांची बैठक मंगळवारी सायंकाळी उशिरा पार पडली. पक्षात फूट पडणार असल्याचा रोहित पवार यांचा आरोप आणि ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या पदावरून निर्माण झालेल्या संभ्रमानंतर झालेली ही पक्षाची पहिलीच बैठक होती. बैठकीच्या सुरुवातीलाच सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या पदाविषयी निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत सुनेत्रा पवार यांनी सारवासारव केली. पक्षात




ज्येष्ठ नेत्यांचा योग्य सन्मान केला जाईल, असेही त्या म्हणाल्या. पक्षात फूट पडणार आहे, २२ आमदार शरद पवार गटात सहभागी होणार आहेत, असे सांगून पक्षाची बदनामी केली जात आहे, त्यांना सडेतोड उत्तर द्या. पक्षात कुठली फूट पडणार नाही. पक्ष एकसंध आहे, असा संदेश समाजात गेला पाहिजे. त्या विषयी वरिष्ठ नेत्यांनी माध्यमांमध्ये बोलले पाहिजे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. माध्यमांमध्ये पक्षाची भूमिका मांडण्याची जबाबदारी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके, छगन भुजबळ, अनिल पाटील यांच्यावर सोपविण्यात आली.

## अमित शहा शेतकऱ्यांना दिलासा देणार; दिल्लीतील कांदा, साखर उद्योगाबाबतच्या उद्याच्या बैठकीकडे लक्ष

■ मुंबई/वृत्तसंस्था

राज्यात कोसळलेले कांद्याचे दर आणि साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणींबाबत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दिली येथे आज, बुधवारी बैठक होणार आहे. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे – पाटीराज्यात कोसळलेले कांद्याचे दर आणि साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणींबाबत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दिली येथे आज, बुधवारी बैठक होणार आहे. ल यांच्यासह अन्य मंत्री दिल्लीला जाणार आहेत.

केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंदी घातल्यामुळे साखर उद्योग अडचणीत आला आहे. २०१९ मध्ये साखरेचे किमान विक्री मूल्य (एमएसपी) ३१ रुपये प्रति किलो निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर २०२६ पर्यंत एमएसपीमध्ये कोणतीही वाढ झाली नाही. पण, २०१९ मधील २,७५० रुपये प्रति टन असलेली एफआरपी वाढून २०२६ मध्ये २९.१० टक्क्यांनी वाढून ३५५० रुपयांवर गेली आहे. साखरेचा दर २०१९ पासून स्थिर आणि एफआरपीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने उद्योगाला आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यासह इथेनॉलच्या खरेदी दरातही अपेक्षित वाढ झाली नाही. इथेनॉल प्रकल्प



आणि प्रकल्पाच्या विस्तारीकरणाला देण्यात येणाऱ्या व्याज सवलत, अनुदानेही १७. ११ कोटी रखडले आहेत. या सर्व विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे.

राज्यात कांदा दराचा प्रश्न चिघळला आहे. शेतकऱ्यांच्या कांद्याला एक रुपये, सव्वा रुपये प्रति किलो दर मिळत आहे. कांदा दराच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीने या प्रश्नी मंगळवारी चांदवड येथे मोर्चा काढल्यामुळे कांद्याच्या दराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नाफेड, एनसीसीएफकडून फक्त दोन लाख टन खरेदी होणार आहे. खरेदी गतवर्षीच्या तुलनेत कमी आणि कमी दराने होणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. या प्रश्नावरही शहा यांच्या उपस्थितीत चर्चा होणार आहे.

## 'कॉक्रोच जनता पार्टीचा आवाज जेवढा दाबाल, तेवढेच ते उसळून येतील'

■ अमरावती/वृत्तसंस्था

कॉक्रोच जनता पार्टीचे अकाउंट बंद (ब्लॉक) करण्यात आल्यानंतर देशभरातून त्यावर प्रतिक्रिया उमटत असतानाच सत्तारूढ शिवसेना शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांनी देखील या मुद्द्यावर परखड भाष्य केले आहे. बच्चू कडू म्हणाले, केंद्र सरकाने या तरूणाईचा आवाज दाबण्याचे काम करू नये, त्यांची ऊर्जा विधायक कामांसाठी वापरायला हवी.

बच्चू कडू म्हणाले, तरूणांनी केवळ व्हॉट्सॲपपुरते मर्यादित न राहता, रस्त्यावर उतरले पाहिजे. प्रत्यक्ष काम केले पाहिजे. सरकारवर अंकुश ठेवला पाहिजे. यात वाईट काय आहे. चांगले काम करायचे असेल, तर त्यात पक्ष ही मर्यादा राहत नाही. केंद्र सरकारने त्यांचा आवाज दाबू नये. जेवढा त्यांचा आवाज दाबला जाईल, तेवढाच तो उसळून बाहेर येईल. कधी-कधी केंद्र सरकार चुकीचा निर्णय घेत असेल, तर ते थांबवले पाहिजे. जर तरूणाई अशा पद्धतीने समोर येत असेल, तर त्यांची ऊर्जा विधायक कामांकडे कशी वळवता येईल, चांगल्या कामांसाठी ती कशी वापरता येईल, याचा विचार व्हायला हवा. तसे प्रयत्न आपण केले पाहिजे.

बच्चू कडू म्हणाले, माझे काम शिवसेना



वाढवण्याचे आहे. कोण मंत्री होणार, कोण जिल्हा प्रमुख होणार, कुणाला पद मिळणार याकडे आपले लक्षच नाही. आमचे लक्ष आहे, पिक घेण्याकडे. ते पीक कुणाला द्यायचे, ते कोणाला विकणार, याकडे आम्ही पाहणार नाही. उत्तम शेती करायची हेच आमचे उद्दिष्ट आहे. पक्षसंघटनेत भरघोस पीक घेण्याकडे आम्ही अधिक लक्ष केंद्रित करणार आहोत. प्रचंड ताकदीतून, मेहनतीतून आम्हाला शिवसेना उभी करायची आहे. त्यामुळे कोण मंत्री कोण आमदार, याविषयी आमचे काहीही घेणे-देणे नाही.

बच्चू कडू म्हणाले, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आंदोलनासाठी रस्त्यावर उतरले, त्याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजेत. ज्या राज्यात काँग्रेसचे सरकार आहे, त्या ठिकाणी कांद्याला काय भाव दिला जातो, हे तपासले पाहिजे. विरोधात आहे, म्हणून त्यांना शेतकरी आठवतो. सत्तेत असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा त्यांना विसर पडतो. आम्ही सत्तेत असूनही शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांच्या प्रश्नांखेरीज आम्ही बोलूच शकत नाही. आमच्या डोक्यात सर्वप्रथम शेतकरी, दिव्यांग बांधव राहतील, हे आम्ही आधीपासूनच सांगत आलो आहे. आगामी खरीप हंगामासाठी शेतीच्या मशागतीसाठी ट्रॅक्टरला डिझेल पुरवायला हवे. ट्रॅक्टरधारकांना अधिक सूट दिली पाहिजे. शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त डिझेल आरक्षित केले पाहिजे.

## १९ वर्षीय आरोपीबाबत धक्कादायक माहिती समोर..

# IRS अधिकाऱ्याच्या मुलीची मोबाइल चार्जरने गळा आवळून हत्या

■ दिल्ली/वृत्तसंस्था

दिल्लीतील एका घरात बुधवारी सकाळी भारतीय महसूल सेवा (IRS) अधिकाऱ्याच्या २२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करून मोबाइल चार्जरच्या वायरने गळा आवळून तिची हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात आयआरएस अधिकार्‍याच्या घरी पूर्वी घरकाम करणाऱ्या १९ वर्षीय राहुल मीना याला दिल्लीतील द्वारका येथून अटक करण्यात आली आहे. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १० तासांत त्याला बेड्या ठोकण्यात आल्या. दरम्यान घटनेचा तपास करत असलेल्या दिल्ली पोलिसांनी मीना याच्याबद्दल काही धक्कादायक खुलासे केले आहेत.

पोलिसांनी सांगितले की, मीना हा राजस्थानच्या अलवर जिल्ह्यातील राजगड येथून १८ महिन्यांपूर्वी दिल्लीतील या कुटुंबाकडे काम करण्यासाठी आला होता.

"पीडितेच्या वडिलांना अलवरमधील कुठल्यातरी जीएसटी अधिकाऱ्याने फोन केला होता, ज्यांनी सांगितले की मीना हा त्यांच्या कार्यालयात काम करायचा आणि तो त्यांच्या कामाला येईल... त्या अधिकाऱ्यांनी त्याला कामावर ठेवण्याची विनंती केली होती. त्यामुळे, कुटुंबाने कोणतीही पडताळणी न करताच त्याला कामावर ठेवले," असे एका



अधिकाऱ्याने सांगितले.

एका शेजाऱ्याने सांगितले की, मीना हा इमारतीच्या पार्किंगमध्ये असलेल्या नोकरांसाठीच्या खोलीत राहायचा. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या घरात काम सुरू केल्यानंतर काही महिन्यांतच, मीनाने कुटुंबाने त्याच्यावर टाकलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेण्यास सुरुवात केली होती. तो दुकानात जायचा, घरासाठी आवश्यक वस्तू विकत घ्यायचा आणि त्याचे पैसे कुटुंबाच्या खात्यावर लिहायला सांगायचा... तो दुकानदारांना महिन्याच्या अखेरीस कुटुंबाकडून पैसे घेण्यास सांगायचा आणि पैसे स्वतःकडे ठेवायचा," असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

एका स्थानिक केमिस्टने सांगितले की, "तो एकदाच ४००-५०० रुपयांची औषधे विकत घ्यायचा आणि मला त्याचे पैसे त्याच्या मालकाकडून घेण्यास सांगायचा. मुलगा सभ्य दिसतायचा आणि मृदू भाषेत बोलायचा, त्यामुळे मी त्याच्यावर विश्वास ठेवायचो."

"पण नंतर वडिलांनी मला पैसे घेतल्याशिवाय राहुलला औषध न देण्याची ताकिद दिली," असेही दुकानदाराने सांगितले. पोलिसांनी सांगितले की, मीना दुकानातून वस्तू खरेदी करायचा पण त्याचे पैसे देत नसल्याबद्दल कुटुंबाकडे अनेक तक्रारी आल्या होत्या. अखेर, दोन महिन्यांपूर्वी जेव्हा शेजाऱ्यांनी तक्रार केली की त्याने त्यांच्याकडून कथितरीत्या दीड लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे, तेव्हा त्याला कामावरून काढून टाकण्यात आले. "घरात काम करणारे येत जात असतात, आणि नियम मोडल्यास बऱ्याचदा त्यांना काढून टाकले जाते. त्याला फक्त नम्रपणे निघून जाण्यास सांगितले होते," असे कुटुंबातील एका सदस्याने सांगितले. पण राहुलने हे मनावर घेतल्याचे पोलीस म्हणाले. प्राथमिक तपासात असे समोर आले की त्याला बेटिंग ॲप्सचा नाद होता आणि तो अमली पदार्थांच्या आहारी गेलाला आहे," असे एका अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांनी पुढे असेही सांगितले की, राहुल मंगळवारी रात्री राजगडमध्ये होता आणि दिल्लीला येण्यापूर्वी त्याने तिथे एका महिलेचा विनयभंग केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी बुधवारी सकाळी अलवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असल्याचेही पोलिसांनी सांगितले.

पुढे पोलिसांनी सांगितले की, राहुलने कथितपणे मंगळवारी ती मोबाइल फोन १३ हजार रुपयांना विकले आणि अलवरहून दिल्लीला येण्यासाठी ६ हजार रुपये देऊन एक ॲम्बुलन्स म्हणून वापरली जाणारी कार बुक केली. पण दिल्लीत पोहचल्यावर तो चालकाल पैसे न देताच गाडीतून उतरून पळून गेला. "राहुलने त्याचा स्वतःचा फोन १० हजार रुपयांना आणि त्याच्या भावाचा आणि मित्राचा फोन प्रत्येकी ३ हजार रुपयांना एका स्थानिक दुकानदाराला विकला... त्याने कथितपणे दुकानदाराला सांगितले होते की, तो परत येऊन त्याचे पैसे परत करेल आणि आपले सर्व फोन पुन्हा विकत घेईल," असे एका अधिकाऱ्याने सांगितले. "तपासात असेही समोर आले आहे की, तो एका खासगी रुग्णालयाची रुग्णवाहिका म्हणून वापरल्या जाणाऱ्या Eeco व्हॅनमधून दक्षिण दिल्लीत आला होता. ज्या घरी त्याला जायचे होते, ते घर शोधण्याच्या बहाण्याने तो गाडीतून उतरला आणि ड्रायव्हरला पैसे न देताच तिथून पळून गेला. तिथून तो चालत पीडितेच्या घरी पोहोचला," असे अधिकाऱ्याने पुढे सांगितले

## अयानची पोलिसांनी काढली धिंड!



■ बारामती/वृत्तसंस्था

परतवाडा येथील लैंगिक शोषण आणि आक्षेपार्ह चित्रफिती प्रसारित करण्याच्या प्रकरणात मुख्य आरोपी अयान अहमद याच्यासह चार आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आल्यानंतर पोलिसांच्या तपासानेही गती घेतली आहे. आज बुधवारी अयानला सोबत घेऊन पोलिसांनी अचलपुरात त्याची 'वरात' काढली. यावेळी आरोपी अयानला धड चालताही येत नसल्याचे दिसून आले. मान खाली घालून तो लंगडत चालताना दिसून आला.

अयान याने काही दिवसांपुर्वी एक आयफोन नुमान नावाच्या एका मित्राला विकला असल्याची माहिती पोलिसांना चौकशीदरम्यान दिली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आज सरमसपुरा परिसरातील नुमानच्या घरी अयानला पायीच नेले. सरमसपुरा पोलीस ठाण्यापासून त्याची अक्षरशः वरात काढण्यात आली. यावेळी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. परतवाडा पोलीस ठाण्यातून त्याला आधी वाहनातून सरमसपुरा पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तेथून त्याला पायी नेण्यात आले.

पोलिसांनी अयानचा मित्र नुमान याच्या घरी पोहचून झडती घेतली. त्याच्याकडून अयानने त्याला विकलेला आयफोन जप्त केला. या मोबाईलमध्ये काही आक्षेपार्ह चित्रफिती किंवा छायाचित्रे असल्याचा संशय पोलिसांना आहे. हा मोबाईल तपासणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहे.

या प्रकरणात आरोपींकडून जप्त करण्यात आलेले ५ मोबाइल तसेच या व्यतिरिक्त जप्त करण्यात आलेले इतर ७ मोबाइल, १ लॅपटॉप, १ टॅब आणि १ हार्ड डिस्क त्वरित विश्लेषणासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या मोबाइलमध्ये ८ पीडित मुलींच्या १८ चित्रफिती आणि ३९ छायाचित्रे आढळून आली. या चित्रफिती इतरांना प्रसारित करणाऱ्या इतर ७ आरोपींनादेखील तपासादरम्यान अटक करण्यात आली आहे.

## पर्यटक महिलेवर कर्नाटकातील होमस्टेमध्ये बलात्कार

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील एका पर्यटक महिलेवर कर्नाटकमधल्या एका होमस्टे सुविधेच्या कर्मचाऱ्यानं लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कर्नाटकच्या कोडगू जिल्ह्यातल्या कुट्टा परिसरातील एका होमस्टेमध्ये ही घटना घडली. या प्रकरणी पीडित पर्यटक महिलेनं होमस्टेमधील कर्मचारी व मालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून त्या दोघांना अटक करण्यात आली आहे. गंभीर बाब म्हणजे आपल्या कर्मचाऱ्यानं केलेला गुन्हा लपवण्यासाठी मालकानं तीन दिवस होमस्टेचं इंटरनेट बंद केलं होतं. पीडित महिलेलाही या काळात त्यानं डांबून ठेवलं होतं. समोर आलेल्या माहितीनुसार, सदर महिला कर्नाटकमध्ये पर्यटनासाठी आली असता कुट्टा भागातील या होमस्टेमध्ये तीन दिवसांसाठी वास्तव्यास होती. गेल्या आठवड्यात तिथे वास्तव्य करत असताना होमस्टेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने तिच्यावर बलात्कार केला. हा सगळा प्रकार समजल्यानंतर होमस्टेच्या मालकानं तो दडवून ठेवण्यासाठी तिथलं इंटरनेट तीन दिवस बंदच ठेवलं. शिवाय, पीडित महिलेनं हा प्रकार इतर कुणाला सांगू नये, यासाठी तिला तीन दिवस होमस्टेमध्येच डांबून ठेवलं. आपल्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पीडित महिलेनं अखेर होमस्टेच्या मालकाला आपण मैसूरला निघून जातोय, असं खोटं सांगितलं. तिथून निसटल्यानंतर पीडित महिलेनं थेट अमेरिकी दूतावासाशी संपर्क साधला. घडलेला सर्व प्रकार तिने दूतावासात कळवला.

## केरळमध्ये फटाक्यांच्या कारखान्यात विस्फोट, 13 जणांचा दुर्दैवी मृत्यू



■ त्रिशूर, वृत्तसंस्था :

केरळच्या त्रिशूर जिल्ह्याच्या मुंडथिक्कोडु भागात मंगळवारी एका फटाक्यांच्या कारखान्यात भीषण विस्फोट झाला आहे. या विस्फोटात 13 जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. त्रिशूर शहरात होणाऱ्या वार्षिक मंदिर उत्सव पूरमची तयारी सुरू असताना ही दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दुःख व्यक्त केले आहे.

विस्फोटावेळी युनिटमध्ये सुमारे 40 जण काम करत होते. 7 जण या दुर्घटनेतून बचावले असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. त्रिशूर पूरमच्या थिरुवंबाडी गटासाठी आतषबाजीचे नमुने तयार केले जात असताना कारखान्यात हा विस्फोट झाला.

घटनास्थळावर मोठ्या प्रमाणात विस्फोटक सामग्री ठेवण्यात आली होती, ज्याला आग लागल्यावर मोठे विस्फोट झाले. प्रारंभिक माहितीत जवळपास 40 जण जखमी झाल्याची बाब समोर आली होती, ज्यातील कमीतकमी 8 जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले होते.

तर दुर्घटनेनंतर प्रशासनाने त्रिशूर मेडिकल कॉलेजसमवेत आसपासच्या रुग्णालयांना अलर्टवर राहण्याचा निर्देश दिला. विस्फोटानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात धूर अन् आग फैलावल्याने बचावकार्यात अडथळे निर्माण झाले. घटनास्थळी अर्धवट जळालेल्या विस्फोटकांमुळे बचावकार्य प्रभावित झाले. पोलीस आणि आपत्कालीन सेवांच्या पथकाने घटनास्थळी पोहोचत स्थितीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु विस्फोट इतका शक्तिशाली होता की याचा आवाज अनेक किलोमीटर अंतरावरही ऐकू आला.

# RCBची अंतिम फेरीत धडक!

# गुजरातवर मिळवला दणदणीत विजय

■ मुंबई, वृत्तसंस्था :

आयपीएल २०२६च्या अंतिम सामन्याचा पहिला संघ ठरला. पहिल्या क्वालिफायर सामन्यात आरसीबीने गुजरात टायटन्सवर दणदणीत विजय मिळवत अंतिम सामन्यात धडक मारली. आरसीबीने गुजरातचा ९२ धावांनी पराभव केला. आरसीबीने सांघिक कामगिरीच्या बळावर हा शानदार विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने २५४ धावांचा डोंगर उभारला. ही धावसंख्या आयपीएल प्लेऑफ इतिहासातील आजवरची सर्वात मोठी धावसंख्या होती. तर पराभूत झालेला संघ गुजरात टायटन्स २९ मे रोजी दुसरा क्वालिफायर सामना खेळणार आहे.

आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केल्यानंतर गुजरातचे गोलंदाज व फिल्डिंगमधील काही चुकांमुळे गुजरातचा संघ मागे पडला. रजत पाटीदार दोन वेळा जीवदान मिळाल्यानंतर त्याने मागे वळून पाहिलं नाही आणि नाबाद ९३ धावांची वादळी खेळी साकारली. यासह आरसीबीने प्रथम फलंदाजी २५४ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात चांगली सुरूवात केल्यानंतर गुजरातचा डाव मात्र पत्त्यांसारखा कोसळला. गुजरातने पॉवरप्लेमध्येच ५ विकेट्स गमावल्या आणि इथेच सामना आरसीबीने आपल्या बाजूने फिरवला.


## पॉवरप्ले ठरला सामन्याचा टर्निंग पॉईंट



आरसीबीने दिलेल्या २५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातने पहिल्या षटकात चौकारांच्या फटकेबाजीसह सुरूवात केली. पण यानंतर मात्र संघाचा डाव पत्त्यांसारखा कोसळला. गुजरातने पॉवरप्लेमध्ये ५ विकेट्स गमावल्या आणि आरसीबीने इथेच सामना आपल्या बाजूने वळवला होता. साई सुदर्शन १४ धावांवर हिट विकेटमुळे बाद झाला. तर भुवनेश्वर कुमारने २ धावांवर शुबमन गिलला तर जोश हेझलवूडने बटलरला २९ धावांवर क्लीन बोल्ड केलं. तर रसिख सलामने सहावं षटक डबल विकेट्स मेडन टाकत गुजरातला मोठे धक्के दिले. रसिखने या षटकात निशांत सिंधु व जेसन होल्डरला बाद केलं. यानंतर वॉशिंग्टन सुंदर ८ धावा, रशीद खान ८ धावा तर कगिसो रबाडा ९ धावांवर बाद झाले. तर गुजरातकडून राहुल तेवतियाने एकट्याने कडवी झुंज दिली. राहुल तेवतिया ४३ चेंडूत ८ चौकार व ४ षटकारांसह ६८ धावा करत बाद झाला. आरसीबीकडून जेबक डफीने ३ विकेट्स, तर रसिख सलामने व भुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी २ विकेट्स हेझलवूड, कृणाल पंड्या यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

तत्पूर्वी गुजरातने नाणेफेक जिंकत आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. वेंकटेश अय्यर व विराट कोहलीची जोडी फलंदाजीसाठी उतरली. वेंकटेश १९ धावा करत झेलबाद झाला. त्यानंतर विराट कोहली व देवदत्त पडिक्कल यांनी दुसऱ्या विकेटसाठी ३८ चेंडूत ७२ धावांची खेळी केली. विराट २५ चेंडूत ४३ धावा तर देवदत्त पडिक्कल ३० धावा करत बाद झाले. यानंतर रजत पाटीदार व कृणाल पंड्या यांनी संघाचा डाव सावरला. दोघांनी ४५ चेंडूत ९५ धावांची खेळी केली. कर्णधार रजत पाटीदारने ३३ चेंडूत ५ चौकार व ९ षटकारांसह ९३ धावांची खेळी केली. तर कृणाल पंड्याने २८ चेंडूत ४३ धावांचं योगदान दिलं. तर जितेश शर्माला अखेरीस सूर गवसला आणि त्याने ५ चेंडूत एक चौकार एक षटकारासह १५ धावांची खेळी केली आणि संघाला २५४ धावांपर्यंत नेण्यात पाटीदारची चांगली साथ दिली. गुजरातकडून कगिसो रबाडा व जेसन होल्डर यांनी प्रत्येकी २ विकेट्स तर प्रसिधने १ विकेट घेतली.

## 'या' WWE स्टारने वैभव सूर्यवंशीची जर्सी घालत खास पोस्ट केली शेअर






■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

वैभव सूर्यवंशीने यंदाच्या आयपीएलमध्ये आपल्या वादळी फटकेबाजीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. अवघ्या १५ वर्षांच्या सूर्यवंशीने प्रत्येक सामन्यात नवेनवे विक्रम आपल्या नावे केले आहेत. दिग्गजांना मागे टाकत सर्वात कमी वयात अनेक विक्रम आपल्या नावे करणारा भारतीय खेळाडू म्हणून त्याने सर्वांचं लक्ष वेधलं. आता आयपीएल २०२६ मध्ये त्याचा संघ राजस्थान रॉयल्स प्लेऑफमध्ये पोहोचला असून एलिमिनेटर सामना खेळणार आहे. यापूर्वी एका WWE स्टारने त्याच्या नावाची जर्सी घालत त्याला पाठिंबा दर्शवला आहे.

आयपीएल २०२६ च्या एलिमिनेटरमध्ये राजस्थान रॉयल्स व सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळवला जाणार आहे, हा सामना आज २७ मे रोजी न्यू चंदीगढमध्ये खेळवला जाईल. या सामन्यातील विजेता संघ गुजरात टायटन्सविरूद्ध दुसरा क्वालिफायर सामना खेळेल. तर पराभूत संघ स्पर्धेतून बाहेर होईल.

राजस्थानच्या या सामन्यापूर्वी WWE स्टार ड्र्यू मॅकइंटायर याने वैभव सूर्यवंशीची जर्सी घालत व्हीडिओ शेअर केला आहे. खरंतर मॅकइंटायर क्रिकेटप्रेमी आहे. तो विशेषतः भारतीय क्रिकेट संघाचा चाहता आहे. त्याने अनेक मोठ्या प्रसंगी संघाला पाठिंबाही दिला आहे. पुन्हा एकदा, मॅकइंटायरने चाहत्यांची मनं जिंकली आहेत. यावेळी, तो १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या नावाची जर्सी घालून जिममध्ये वर्कआऊट करताना दिसला. आयपीएल २०२६ सध्या भारतात चर्चेत आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने गुजरातला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. लवकरच राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात एलिमिनेटर सामना खेळला जाईल.वैभव सूर्यवंशीने राजस्थानकडून खेळताना धुमाकूळ घातला आहे. त्याने ५०० हून अधिक धावा केल्या आहेत. वयाच्या १५ व्या वर्षी तो जागतिक स्तरावर प्रसिद्ध झाला आहे. एलिमिनेटर सामन्यापूर्वी ड्र्यू मॅकइंटायरने सूर्यवंशीला पाठिंबा दिला आहे. मॅकइंटायरने इन्स्टाग्रामवर जिममध्ये व्यायाम करत असल्याचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्याने ०३ जर्सी क्रमांक असलेला आणि सूर्यवंशीचं आडनाव असलेली राजस्थानची जर्सी घातली आहे. मॅकइंटायरचा हा व्हिडिओ इंटरनेटवर व्हायरल होत आहे.

## दिव्याची जगज्जेतीवर मात, 'आर्मगिडॉन' डावात वेन्जूनवर सरशी

■ ओस्लो/वृत्तसंस्था

भारताची युवा ग्रँडमास्टर दिव्या देशमुखने प्रतिष्ठेच्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत संस्मरणीय पदार्पण करताना पहिल्याच फेरीत महिला जगजेत्या जू वेन्जूनचा 'आर्मगिडॉन' डावात पराभव केला. विशेष म्हणजे, नागपूरच्या २० वर्षीय दिव्याने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना बाजी मारली. खुल्या विभागात जगज्जेता दोम्माराजू गुकेश, आर. प्रज्ञानंद या भारतीयांनीही सकारात्मक सुरुवात केली.

रेटी/कॅटलान पद्धतीने खेळल्या गेलेल्या लढतीत दिव्याने पटाच्या मध्यभागावर नियंत्रण राखत जू वेन्जूनला प्रत्येक चालीसाठी विचार करायला भाग पाडले. दिव्याने हत्तीचा प्रभावी वापर करत बचाव भक्कम ठेवला. वेन्जूनने राजाच्या बाजूने आक्रमक चाली रचण्याचा प्रयत्न केला, पण दिव्याने अचूक खेळ करत वेन्जूनच्या राजावर दडपण निर्माण केले. अखेरीस ५२ चालींनंतर पारंपरिक डाव बरोबरीत सुटला. त्यानंतर बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी झालेल्या 'आर्मगिडॉन' डावात दिव्याने शानदार खेळ करत विजय मिळवला. 'आर्मगिडॉन' डावात पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या खेळाडूला १० मिनिटे, तर काळ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या खेळाडूला ७ मिनिटांचा वेळ दिला जातो. पांढऱ्या मोहऱ्यांनी विजय मिळवणे आवश्यक असते, तर काळ्या मोहऱ्यांनी बरोबरीही पुरेशी ठरते. या दडपणाखाली दिव्याने संयम राखत विजय मिळवला.



तिने अश्वाच्या अप्रतिम चालीने वेन्जूनला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. त्या चालीमुळे वेन्जूनवर वजीर गमावण्याची वेळ आली आणि त्यानंतर पुनरागमन करणे तिला अशक्य झाले. खुल्या विभागात गुकेश आणि प्रज्ञानंद यांनी आपल्या सामन्यांत 'आर्मगिडॉन' टायब्रेकमध्ये विजय मिळवला. गुकेशला जर्मनीचा ग्रँडमास्टर व्हिन्सेन्ट केमेरविरुद्ध संघर्ष करावा लागला. या दोघांमधील पारंपरिक डाव जवळपास पाच तास आणि १४४ चालींनंतर बरोबरीत सुटला. त्यानंतर टायब्रेकमध्ये गुकेश विजयी ठरला. दुसरीकडे, प्रज्ञानानंदने अमेरिकेचा ग्रँडमास्टर वेस्ली सो याच्याविरुद्ध पारंपरिक डाव बरोबरीत सोडवल्यानंतर 'आर्मगिडॉन'मध्ये बाजी मारत १.५ गुण मिळवला. महिला विभागातील अन्य भारतीय बुद्धिबळपटू कोनेरू हम्पीने मात्र निराशाजनक कामगिरी केली. तिला बिबिसारा असाउबायेवाने पारंपरिक डावातच पराभूत केले.

## सामन्यादरम्यान अर्ध्या तासाच्या लेझर शोवर कडाडून टीका

■ ओस्लो/वृत्तसंस्था

लाईव्ह मॅचदरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचा अगम्य प्रकार आयपीएल स्पर्धेतील प्लेऑफच्या महत्त्वपूर्ण लढतीत पाहायला मिळाला. हिमालयाच्या पायथ्याशी वसलेल्या धरमशाला इथल्या स्टेडियममध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना सुरू आहे. पहिली इनिंग्ज संपल्यानंतर मैदानाचं सांस्कृतिक व्यासपीठात रुपांतर झालं.

अर्धा तास चाललेल्या या कार्यक्रमाची सुरुवात व्हायोलिन जुगलबंदीने झाली. माँ तुझे सलाम आणि चक दे इंडियाच्या धूनवर ही जुगलबंदी रंगली. त्यानंतर लेझर शो झाला



आणि मग मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वीच इंधन वाचवा, संसाधनं वाचवा असं आवाहन केलं होतं. मात्र प्लेऑफसारख्या महत्त्वपूर्ण लढतीदरम्यान खेळाडूंची एकाग्रता भंग करून एवढा मोठा कार्यक्रम गरजेचा होता का असा प्रश्न विचारला जातो आहे. सोशल मीडियावर लोकांनी कठोर शब्दात या कार्यक्रमावर टीका केली आहे. मैदानात डीजेवर गाणी वाजतात हे ठीकेय पण सामना सुरू असताना अर्धा तास अशा स्वरुपाचा कार्यक्रम करणं हे विचित्र आहे असं अनेकांनी म्हटलं आहे. इंधन वाचवा यासाठी उपाययोजना सुरू असताना इतक्या मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी कोणासाठी असा सवाल अनेकांनी विचारला आहे.

चाहते क्रिकेटचा सामना पाहण्यासाठी आले आहेत. तो त्यांना शांतपणे पाहू द्या असंही अनेकांनी म्हटलं आहे. मुंबई, चेन्नई, कोलकाता या मोठ्या केंद्रांऐवजी धरमशालाला प्लेऑफसारखी महत्त्वपूर्ण लढतीचा मान देण्यात आला आहे. लेझर शो, फटाक्यांची आतषबाजी हे शक्तिप्रदर्शन आहे अशी खोचक टीकाही काहींनी केली आहे.

# धुरंधर ' मुळे सुरक्षा धोक्यात! सैनिकाकडूनच याचिका दाखल, गुपित दाखवलं, हायकोर्टाचे तपासणीचे आदेश

एका जनहित याचिकेच्या सुनावणी दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय तसेच सेन्सॉर बोर्डाला 'धुरंधर' या चित्रपटातील काही सीन्स संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सुरक्षेच्या चिंतेचा विचार करावा आणि त्यावर योग्य तो निर्णय घ्यावा असे निर्देश दिले आहेत. याचिकाकर्त्याने उपस्थित केलेले मुद्दे 'विचारात घेण्यासारखे' आहेत आणि त्यांचे 'योग्य प्रकारे निवारण होणे' आवश्यक असल्याचे न्यायालयाचे म्हणणे आहे.आदित्य धर दिग्दर्शित आणि रणवीर सिंहची मुख्य भूमिका असलेल्या 'धुरंधर' चित्रपटाविरोधात एका लष्करी जवानानेच याचिका दाखल केली होती. ते स्वतः न्यायालयात उपस्थित राहिले होते. या चित्रपटामध्ये काही अशी सीन्स आहेत, जी लष्कर आणि सुरक्षा दलांद्वारे वापरल्या जाणाऱ्या रणनीती, कार्यपद्धती तसेच काही संवेदनशील ठिकाणे अत्यंत स्पष्टपणे दर्शवतात; ज्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होतो असा युक्तिवाद त्यांनी केला. याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे की, जरी या चित्रपटाला 'काल्पनिक कथा' म्हणून संबोधले जात असले, तरीही अशा प्रकारचे चित्रण देशाची सुरक्षेच्या हिताचे मानले जाऊ शकत नाही; उलट, ते देशाच्या सुरक्षेसाठीच एक प्रकारे धोका ठरते.सुनावणीदरम्यान, न्यायालयाने आपले



मत नोंदवले की, चित्रपटांचा प्रभाव केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसतो. यावेळी त्यांनी एक उदाहरण देत म्हटले की जर एखाद्या चित्रपटात जीव देण्याच्या पद्धती ऑनलाइन शोधण्यासारखे सीन अत्यंत तपशीलवारपणे चित्रित केले गेले, तर अशा सीन्समागे काही 'उद्देश' आहे का, हा प्रश्न निर्माण होतो. चित्रपटांचा प्रभाव नाकारता येत नाही, आणि नेमक्या याच कारणामुळे सेन्सॉरशिप आणि मार्गदर्शक तत्त्वांची आवश्यकता असते.याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयाकडे धाव घेत म्हटले की, 23 मार्च 2026 रोजी त्यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रालय तसेच सेन्सॉर बोर्डाकडे एक सविस्तर निवेदन सादर केले होते; ज्यामध्ये चित्रपटातील काही सीन्सबाबत आक्षेप नोंदवलेले. याचिकाकर्त्याने पुढे असेही नमूद केले की, या मुद्द्यासंदर्भात त्यांनी सर्वोच्च न्यायालयातही एक याचिका दाखल केली होती. आपल्या आदेशात, न्यायालयाने संबंधित सक्षम प्राधिकरणाला निर्देश दिले की, त्यांनी या याचिकेला एक 'औपचारिक निवेदन' म्हणून ग्राह्य धरावे, संपूर्ण प्रकरणाची छाननी करावी आणि आवश्यक वाटल्यास 'सुधारात्मक उपाययोजना' कराव्यात. शिवाय, या संदर्भात जो निर्णय घेतला जाईल, तो याचिकाकर्त्याला कळवला जावा.धुरंधर' हा चित्रपट डिसेंबर 2025 मध्ये प्रदर्शित झाला; त्याने जगभरात एकूण 1,307.35 कोटींची कमाई केली, तर भारतात 840.20 कोटींचा गल्ला जमवला. त्याचा पुढील भाग 'धुरंधर 2' 18 मार्च 2026 रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाने भारतात एकूण 1,371,95 कोटी आणि निव्वळ 1,146.35 कोटींची कमाई केली आहे. जगभरात, या चित्रपटाने एकूण 1,798.62 कोटींची कमाई केली आहे. धुरंधर 2' हा चित्रपट अधिकृतपणे OTT प्लॅटफॉर्म्सवर प्रदर्शित झाला असला, तरीही बॉक्स ऑफिसवरील त्याची कमाई अजूनही सुरूच आहे. आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसाठी हा चित्रपट 14-15 मे रोजी 'नेटफ्लिक्स' या OTT प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला असला, तरी आता 4 जूनपासून भारतीय प्रेक्षकांसाठी तो 'Jio Hotstar' वर प्रदर्शित होणार आहे. विशेष म्हणजे, प्रेक्षकांना या चित्रपटाची एक 'मूळ आणि यापूर्वी कधीही न पाहिलेली' आवृत्ती पाहता येईल.

# करण कुंद्राचं तेजस्वी प्रकाशला फिल्मी स्टाईल प्रपोज, जोडप्यानं ऑनस्क्रीन उरकला साखरपुडा

करण कुंद्रा आणि तेजस्वी प्रकाश ही सर्वात लोकप्रिय टीव्ही जोडप्यांपैकी एक आहेत. चाहत्यांना त्यांची केमिस्ट्री खूप आवडते. हे जोडपं त्यांच्या लग्नामुळेही चर्चेत आहे. आता, करण आणि तेजस्वीचे चाहते ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते, तो क्षण अखेर आला आहे. चार वर्षांच्या डेटिंगनंतर, करण कुंद्रानं तेजस्वी प्रकाशला प्रपोज केलं असून त्यांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. नेटफ्लिक्सच्या 'देसी ब्लिंग' या रिॲलिटी शोच्या शेवटच्या एपिसोडमध्ये, करण कुंद्रानं तेजस्वी प्रकाशला रोमँटिक प्रपोज केलं. करण कुंद्रानं शोच्या शेवटच्या एपिसोडमध्ये तेजस्वीसाठी एक खास सरप्राईज प्लॅन केलं होते. या खास प्रसंगासाठी अनेक कलाकारही उपस्थित होते. जेव्हा तेजस्वी तिथे पोहोचली आणि तिनं मोठी सजावट पाहिली आणि तिला सुखद धक्का बसला.स्विमिंग पूलमध्ये 'माझ्याशी लग्न करशील का?' असं लिहिलं होतं. हे पाहून अभिनेत्री तेजस्वी खूप भावुक झाली. करणने गुडघ्यावर



बसून एका मोठ्या हिऱ्याच्या अंगठीसह तिला प्रपोज केलं. तेजस्वीचा आनंद गगनात मावेनासा झाला आणि तिनं अभिनेत्याला होकार दिला. या जोडप्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. त्यांचे चाहते या व्हिडिओवर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत. या शोमध्ये त्यांच्या नात्याची अनेकदा परीक्षा झाली आहे. जेव्हा त्यांच्यात भांडणं झाली असे अनेक क्षण आले. पण या खऱ्या आयुष्यात तेजस्वी आणि करण यांचं प्रेम कधीच कमी झालं नाही. छोट्या पडद्यावर साखरपुडा केल्यानंतर आता हे जोडपं लग्न कधी करणार, याकडे चाहत्यांचं लक्ष वेधलं आहे.दरम्यान, करण कुंद्रा आणि तेजस्वी प्रकाश २०२१ पासून रिलेशनशिपमध्ये आहेत. त्यांची भेट 'बिग बॉस १५' मध्ये झाली आणि तेव्हापासून ते एकत्र आहेत. सध्या, करण आणि तेजस्वी 'लाफ्टर शेफ' या रिॲलिटी शोच्या तिसऱ्या सीझनमध्ये दिसत आहेत.

# 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेतून पूर्वाची एग्झिट

लोकप्रिय मालिका वीण दोघांतली ही तुटेना या मालिकेत एक नवे रंजक वळण आले होते. मालिकेत समरची मैत्रीण किमया आल्यामुळे कथानकात मोठी उलथापालथ झाली होती. प्रसिद्ध अभिनेत्री पूर्वा गोखले हिने मालिकेत किमयाची भूमिका साकारली होती. पण, आता या मालिकेत मोठा ट्विस्ट घेऊन आलेली किमया मालिकेतून एग्झिट घेणार आहे.

किमयाच्या येण्यामुळे स्वानंदीला समरवर असलेल्या प्रेमाची जाणीव होते. एका पार्टीत दारू पिऊन स्वानंदी समरसमोर तिच्या मनातील भावना, प्रेम भडाभडा बोलून टाकते. पण, इथेही ट्विस्ट आहेच. समरला वाटते स्वानंदी दारू प्यायली, त्यामुळे बडबडते आणि तो तिच्या बोलण्यावर अजिबात विश्वास ठेवत नाही. पण आताच कुठे एन्ट्री घेतलेली अभिनेत्री लगेचच एग्झिट घेत असल्यामुळे चाहते कोड्यात पडले आहेत. प्रसिद्ध अभिनेत्री पूर्वा गोखले हिने 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेत एन्ट्री घेतली आणि चाहत्यांच्या आनंदाला पारावारच उरला नाही. किमया हे केवळ एक नवे पात्र नसून ती समरची जुनी मैत्रीण आणि त्याची एक्स गर्लफ्रेंड. परदेशातून भारतात परतल्यानंतर ती थेट समरच्या घरी राहायला येते, ज्यामुळे घरातील




वातावरण आणि नात्यांची समीकरणे पूर्णपणे बदलून जातात. पण, आता हीच किमया मालिकेतून एग्झिट घेणार आहे. स्वतः पूर्वा गोखले हिने याबाबत पोस्ट करुन माहिती दिली आहे.

पूर्वा गोखले हिने तिच्या सोशल मिडिया अकाऊंटवर याबाबत एक खास पोस्ट शेअर केली आहे. पोस्ट करत तिने आपण मालिकेतून एग्झिट घेत असल्याचे सांगितले आहे. खरंतर पूर्वाची मालिकेत पाहुणी कलाकार म्हणून एन्ट्री झालेली. त्यामुळे काहीच एपिसोडसाठी आलेली किमया आता मालिकेतून एग्झिट घेणार आहे. 'वीण दोघांतली ही तुटेना' या मालिकेच्या सेटवर केक कापून सेलिब्रेशन सुद्धा करण्यात आले. दरम्यान, पूर्वाने तिच्या पोस्टमध्ये सेटवरचे काही न पाहिलेले फोटोसुद्धा पोस्ट केले आहेत.

# लग्न झाल्यामुळे सिनेमासाठी नाकारलं; मराठी अभिनेत्रीनं सांगितला प्रसंग, म्हणाली, 'माझ्यासाठी सरप्रायजिंग'

इंडस्ट्रीमध्ये अनेक कलाकारांना वेगवेगळ्या कारणास्तव नकाराचा सामना करावा लागतो. त्याबद्दल कलाकार मुलाखतींमध्ये भाष्यही करतात. अशातच आता मराठी अभिनेत्री पायल जाधवनंही तिला मिळालेल्या नाकाराबद्दल सांगितलं आहे. लग्न झाल्यामुळे अभिनेत्रीला सिनेमासाठी नकार देण्यात आला, असं तिनं सांगितलंय.मराठी अभिनेत्री पायल जाधवनं अनेक मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे. पायल सोशल मीडियावर तिच्या प्रोफेशनल आयुष्याबद्दल अपडेट्स देत असते. मात्र, वैयक्तिक आयुष्य खासगी ठेवण्याचा अभिनेत्रीचा प्रयत्न असतो. पायल जाधवच्या लग्नाला सहा वर्षे झाली असून तिचा नवरा आयटी क्षेत्रात नोकरीला आहे. पायल सोशल मीडियावर नवऱ्यासोबतचे फोटो जास्त शेअर करत नसल्यामुळे अनेकांना तिच्या लग्नाबद्दल माहिती नाही. त्यामुळे एकदा पायलचं लग्न झालंय हे समजल्यामुळे अभिनेत्रीला सिनेमासाठी नकार देण्यात आला.इट्स मज्जा'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये पायलला लग्न सगळ्यांसमोर रिव्हील न करणं हे ठरवलेलं आहे की, त्याचा परिणाम कामावर झालाय?' असं विचारलं असता अभिनेत्री म्हणाली की, 'खूपच विचित्र अनुभव होता. सिनेमाची संपूर्ण कथा ऐकली आणि त्यात इंटिमेट सीन्स होते. मला सिनेमाची स्क्रिप्ट आवडली आणि मी होकार दिला.'बोलता-बोलता मी म्हटलं मुंबईत नवऱ्यासोबत राहते. त्यावेळी त्यांनी सांगितलं की, तुझं लग्न झालंय त्यामुळे तू हा सिनेमा नाही करू शकत. मलाही तेव्हा काय प्रतिक्रिया द्यायची हे समजत नव्हतं. माझ्यासाठी सरप्रायजिंग होतं. मला लोक सांगायचे, लग्नाबद्दल फार बोलू नकोस. पण माझा हा विचारच नव्हता. माझ्या नवऱ्याची इच्छा आहे का? तो माझा नवरा आहे हे लोकांना सांगावं का? तर आता त्याला असं नाही वाटत अजिबात' असं पायलने पुढे सांगितलं.दरम्यान, पायल जाधवच्या कामाबद्दल सांगायचं तर सध्या अभिनेत्री झी मराठी वाहिनीवरील 'तारिणी' या मालिकेत झळकत आहे. या मालिकेमध्ये पायलने हरप्रीत चड्ढाची भूमिका साकारली आहे. पायलच्या भूमिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसादही मिळतोय. त्याचबरोबर पायलने यापूर्वी 'अबीर गुलाल', 'मानवत मार्डर्स' यांसारख्या मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# घामामुळे प्रचंड थकवा, शरीराची चिकचिक होते?

## अंघोळीच्या पाण्यात हे खास पदार्थ घाला, दिवसभर वाटेल फ्रेश, ताजतवाणं राहण्यासाठी करा हे साधे उपाय

**उन्हाळ्यात जास्त घाम येणे, शरीराला चिकचिक होणे आणि दुर्गंधी निर्माण होणे ही अनेकांची सामान्य समस्या आहे. घामासोबत शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्स कमी झाल्यामुळे थकवा आणि अशक्तपणा जाणवू शकतो. वैज्ञानिक अभ्यासानुसार, अंघोळीच्या पाण्यात बेकिंग सोडा, तुरटी आणि लिंबाचा रस मिसळल्याने त्वचेचा संतुलित राहतो, बॅक्टेरियाची वाढ कमी होते आणि शरीराची दुर्गंधी नियंत्रणात राहते. तसेच, हे उपाय त्वचेवरील अतिरिक्त घाम कमी करण्यास आणि दिवसभर फ्रेश वाटण्यास मदत करतात. जाणून घ्या या नैसर्गिक उपायांचे वैज्ञानिक फायदे आणि वापरण्याची योग्य पद्धत.**

उन्हाळ्यात किंवा अतिशय दमट हवामानामध्ये शरीराला प्रचंड घाम येणे आणि त्यामुळे एक प्रकारचा शारीरिक थकवा जाणवणे ही केवळ बाह्य समस्या नसून त्यामागे एक जैविक कारण आहे. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनवर प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार, जेव्हा शरीर स्वतः चे तापमान नियंत्रित राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात घाम बाहेर टाकते, तेव्हा घामासोबत शरीरातील पाणी आणि महत्त्वाची खनिजे ( जैसे की सोडिअम, पोटॅशिअम) बाहेर पडतात. यामुळे शरीरात ऊर्जेची कमतरता निर्माण होऊन थकवा आणि सुस्ती जाणवू लागते. तसेच, घाम हा मूळतः गंधहीन असतो. परंतु, जेव्हा तो त्वचेवर आधीपासूनच उपस्थित असलेल्या जिवाणूंच्या ( आणि ) संपर्कात येतो, तेव्हा त्याचे विघटन होऊन शरीराला दुर्गंध आणि चिकचिक जाणवू लागते. जागतिक स्तरावरील आघाडीच्या वैद्यकीय संशोधन संस्थांच्या अभ्यासावर आधारित, अंघोळीच्या पाण्यात काही विशिष्ट घटकांचा वापर करून ही समस्या कशी मुळापासून दूर करता येते, याचे वैज्ञानिक विश्लेषण खालीलप्रमाणे आहे:





## तुरटी

**मेयो क्लिनिक च्या अभ्यासानुसार, तुरटी हा एक उत्कृष्ट नैसर्गिक ॲस्ट्रिंजंट आणि अँटीसेप्टिक घटक आहे. ती त्वचेवरील रोमकूप तात्पुरत्या स्वरूपात संकुचित करते, ज्यामुळे जास्त घाम येण्याची प्रक्रिया नैसर्गिकरित्या मर्यादित होते. शारीरिक दुर्गंधावर दीर्घकालीन नियंत्रण मिळवण्यासाठी हा अत्यंत प्रभावी उपाय आहे**

## बेकिंग सोडा...



**जर्नल ऑफ द इंटेग्रेटीव्ह डर्माटोलॉजी संशोधनानुसार, बेकिंग सोड्यामध्ये नैसर्गिक क्षारीय गुणधर्म असतात. घामामुळे त्वचेवर तयार होणारे आम्लधर्मीय वातावरण हे बॅक्टेरियासाठी पोषक असते. पाण्यात १ ते २ चमचे बेकिंग सोडा मिसळल्यास तो त्वचेची पातळी संतुलित करतो, ज्यामुळे दुर्गंध निर्माण करणाऱ्या जिवाणूंची वाढ जागीच रोखली जाते**

## ....लिंबाचा रस....





# दागिन्यांच्या मोहाने वृद्ध महिला नातेवाईकाला संपवलं, बॉडी घाटात फेकली

**वृत्तसंस्था/रायगड**

अलिबाग तालुक्यातील सारळ आदिवासीवाडी येथील एका ८५ वर्षीय सुनंदा लक्ष्मण पाटील यांच्या बेपत्ता प्रकरणाचा मांडवा पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत उलगडा करत दागिन्यांच्या हव्यासापोटी झालेल्या हत्येचं गूढ उकललं आहे. याप्रकरणी महिलेचा नातेवाईक अनदर्श हिराजी शेडगे (वय ३२) आणि रितेश नरेश लोहार (वय २०, दोघे रा. तिनविरा, ता. अलिबाग) यांना अटक करण्यात आली असून या घटनेमुळे रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. सुनंदा पाटील या ३१ मे २०२६ पासून बेपत्ता झाल्यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी मांडवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. सुरुवातीला बेपत्ता प्रकरण म्हणून तपास सुरू असताना चौकशीत हत्येचा संशय बळावला. तपासादरम्यान आरोपींनी दागिने लुटण्याच्या उद्देशाने कट रचून महिलेचं अपहरण केल्याचं उघड झालं. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी सुनंदा पाटील यांना सारळ येथून तिनविरा परिसरात नेऊन गळा आवळून हत्या केली. त्यानंतर गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटातील बावली टोक ते दाभिल टोक दरम्यानच्या खोल दरीत फेकून दिला. तपासादरम्यान पोलिसांनी संशयित अनदर्श शेडगेला ताब्यात घेतलं असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि मृतदेह फेकल्याचं ठिकाण दाखवून दिलं. त्यानंतर अलिबाग पोलिसांचं पथक घटनास्थळी दाखल झालं. घाटातील अत्यंत धोकादायक आणि खोल दरीतून मृतदेह बाहेर काढण्यासाठी प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम तसेच महाबळेश्वर ट्रेकर्सच्या सदस्यांनी विशेष मोहीम राबवली. जवानांनी जीव धोक्यात घालून दरीत उतरून मृतदेह बाहेर काढला. घटनेची गंभीरता लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने या गुन्ह्याचा छडा लावला. याप्रकरणी मांडवा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच आंबेनळी घाटात झालेल्या भीषण अपघाताची घटना ताजी असतानाच आता हत्या प्रकरण उघडकीस आल्यानं परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. यापूर्वीही या घाट परिसरात संशयास्पद मृतदेह आढळल्याच्या घटना घडल्या असल्यानं आंबेनळी घाट पुन्हा एकदा गंभीर गुन्हेगारी घटनेमुळे चर्चेत आला आहे. पोलिसांकडून मृतदेहाच्या विल्हेवाटीचा संपूर्ण घटनाक्रम, चोरीस गेलेल्या दागिन्यांचा तपास आणि गुन्ह्यातील अन्य बाबींचा सखोल तपास सुरू आहे.

# हॉटेलात आग, व्यापाऱ्याने लोकांच्या सुटकेसाठी गाद्या पसरल्या, दोन लाखांचं नुकसान, पण ८ जीव वाचले!

**जनसंचलन/ नवी दिल्ली**



दिल्लीतील मालवीय नगर भागात असलेल्या ङ्गफ्लोरिश स्टे - बी अँड बीफ या हॉटेलमध्ये बुधवारी सकाळी भडकलेल्या आगीत १२ परदेशी नागरिकांसह एकूण २१ जणांचा मृत्यू झाला, तर इतर अनेक जण जखमी झाले आहेत. आग लागल्यावर गादी विक्रेत्या व्यापाऱ्याने आगीतून बाहेर पडणाऱ्या लोकांच्या बचावासाठी क्षणाचाही विचार केला नाही. जवळपास २ लाख रुपये किमतीच्या मालाचा त्याग करत त्याने तात्पुरते सुरक्षा जाळे उभे केले. बळी पडलेल्यांपैकी बहुतांश जण वैद्यकीय उपचारांसाठी तिथे राहत होते. जवळच्या एका खाजगी रुग्णालयातील आलेले रुग्ण आणि त्यांच्या काळजीवाहकांचा मृतांमध्ये समावेश आहे. आग लागताच रियाझुद्दीन मन्सूरी यांनी केवळ फोटो-व्हिडिओ काढत मूक प्रेक्षक बनण्याऐवजी, आपल्या कर्मचाऱ्यांना सोबत घेतलं. जळत्या इमारतीबाहेर उडी मारणाऱ्या रहिवाशांना आधार देण्यासाठी त्यांनी अनेक रजया आणि गाद्या पसरवल्या. रियाझुद्दीन मन्सूरी यांचा मुलगा अरमान म्हणाला, ङ्गसकाळी साडेआठ वाजता एका शेजाऱ्याने आगीबद्दल माहिती दिल्यावर मी घटनास्थळी पोहोचलो. मालवीय नगरमधील हौझ राणी भागातील त्या इमारतीच्या तळ मजल्यावर आग लागली होती. कोणालाही आत जाता किंवा बाहेर येता येत नव्हते. वरच्या मजल्यांवरील लोक ओरडून विचारत होते की त्यांनी खाली उडी मारावी का. आम्ही त्वरित दुकानातून सुमारे २० ते २५ गोधड्या आणि गाद्या बाहेर काढल्या व इमारतीबाहेर पसरवल्या. त्यांच्यावर सुमारे आठ जणांनी उड्या मारल्या आणि ते सुखरुप राहिले. केवळ काही जणांना किरकोळ दुखापत झाली असे तो म्हणाला.

# गर्भलिंग रॅकेटमागे एकच सूत्रधार; तीन जिल्ह्यांतील कारवायांत नरेंद्र ठाकरेचे नाव समोर

**जनसंचलन/ पुणे**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता, पुणे जिल्ह्यातील शिरूर-वाघोली आणि नुकत्याच उघडकीस आलेल्या यवत येथील गर्भलिंग निदान प्रकरणांमध्ये एक समान धागा समोर येत असून, तिन्ही प्रकरणांमध्ये नरेंद्र साहेबराव ठाकरे याचे नाव एजंट म्हणून पुढे आले आहे. त्यामुळे उघडकीस आलेल्या गर्भलिंग निदानाच्या साखळीमागील प्रमुख सूत्रधार तोच असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मार्च २०२६ मध्ये वाघोली पोलिसांच्या कारवाईत अटक झालेला ठाकरे, राहाता तालुक्यातील मोबाइल गर्भलिंग निदान रॅकेटमध्ये एजंट म्हणून समोर आलेले धागेदोरे आणि यवत प्रकरणातील पोर्टेबल सोनोग्राफी मशीनचा पुरवठादार म्हणून ठाकरेचे नाव पुढे आले आहे. मार्च २०२६ मध्ये गुन्हे शाखेने डोकसावंगी येथे छापा टाकून नरेंद्र ठाकरेला अटक केली होती. त्या वेळी त्याच्याकडून जप्त साहित्य, त्याचे संपर्क, आर्थिक व्यवहार, पोर्टेबल सोनोग्राफी यंत्रांचा पुरवठा आणि इतर जिल्ह्यांतील नेटवर्क यांची सखोल चौकशी झाली का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. यवत प्रकरणात समोर आलेल्या माहितीनुसार ठाकरेचे नाव पुन्हा पुढे आल्याने मार्चमधील तपासाची व्याप्ती आणि त्यानंतरच्या चौकशीवरही चर्चा सुरू झाली आहे. मार्च महिन्यातील कारवाईनंतर आरोपींच्या संपूर्ण नेटवर्कचा




माग काढण्यात यश आले असते, तर यवतमध्ये मे-जून महिन्यात समोर आलेले मोठे रॅकेट कदाचित आधीच उघडकीस आले असते, अशी चर्चा तपास वर्तुळात आहे. यवत प्रकरणात १२ ते १५ डॉक्टरांच्या संपर्काचे धागेदोरे समोर आले आहेत. हजारो महिलांची गर्भलिंग चाचणी झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे हे प्रकरण केवळ एका गावापुरते किंवा एका जिल्ह्यापुरते मर्यादित नसून राज्यव्यापी नेटवर्क असण्याची शक्यता तपास यंत्रणा पडताळून पाहत आहेत. यवत, राहाता आणि शिरूर या तिन्ही ठिकाणच्या तपासातील धागे एकत्र केल्यानंतर नरेंद्र ठाकरेची भूमिका अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# नीट परीक्षा पुन्हा देण्याचं धाडस नाही, नागपुरात विद्यार्थिनीने आयुष्य संपवलं

**वृत्तसंस्था/ नागपूर**



नागपूर : नीट पेपरफुटीमुळे आकांक्षा चतुर्वेदी हिने जीव दिल्याचे उघडकीस आले आहे. ङ्गपुन्हा परीक्षा देण्याची धाडस होत नसल्याने आत्महत्या करीत आहेफ असे नमूद असलेली तिची चिठ्ठी समोर आली आहे. २० मे रोजी आकांक्षाने अंबाझरी परिसरातील अजयनगर येथील घरी ओढणीने गळफास लावत आयुष्याची अखेर केली होती. पेपरफुटीची ती बळी ठरल्याची चर्चा देशभर होत आहे. आकांक्षा ऊर्फ स्नेहा कृष्णकुमार चतुर्वेदी ऊर्फ चौबे (वय १८) हिच्या मृत्यू प्रकरणाचा तपास सुरू असताना तिने लिहिलेली चिठ्ठी आढळली. ङ्गमी टोकाचे पाऊल उचलत आहे. आई, बाबा मला माफ करा. पहिल्या नीटचा पेपर चांगला गेला. मला चांगले गुण मिळण्याची खात्री होती. परंतु, आता दुसऱ्यांदा परीक्षा देण्यासाठी माझे धाडस होत नाही. मी खूप पैसे वाया घालवले. तुमच्यावर दबाव टाकला, मला माफ करा,फ असे आकांक्षाने चिठ्ठीत लिहिले आहे. देशभरात ३ मे रोजी ङ्गनीटफ परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या परीक्षेचे पेपर फुटल्याचे उघडकीस आल्यानंतर केंद्रीय शिक्षण खात्याने संपूर्ण परीक्षा रद्द केली. २१ जून पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. हा धक्का आकांक्षाला सहन झाला नाही. २० मे रोजी दुपारी आई नीलमने आकांक्षाला जेवणाबाबत विचारणा केली. ङ्गनंतर जेवते,फ असे म्हणत ती खोलीत गेली. यादरम्यान तिने ओढणीने गळफास घेऊन आयुष्याची अखेर केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८